# संरक्षण सेवेमध्ये अधिकारी होण्याची
# महाराष्ट्रातील युवक व युवतींना सुवर्ण संधी

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## Notification for admission to SPI

## सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, (मुले) छत्रपती संभाजीनगर

## सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था, (मुली) नाशिक

१. संरक्षण सेवेमध्ये अधिकारी म्हणून महाराष्ट्रातील युवक व युवती जास्तीत जास्त संख्येने जावे, ह्यासाठी महाराष्ट्र शासनाने छत्रपती संभाजीनगर येथे मुलांसाठी व नाशिक येथे मुलींसाठी सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्थेची स्थापना केलेली आहे.

२. जून २०२४ मध्ये सूरू होणा-या छत्रपती संभाजीनगर येथील मुलांच्या ४८ व्या तुकडीसाठी व नाशिक येथील मुलींच्या दुस-या तुकडीसाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

३. पात्रता:- (अ) अविवाहित (मुलगा / मुलगी). (ब) **महाराष्ट्राचे अधिवासी (Domicile) तसेच कर्नाटक राज्यातील फक्त बिदर, बेळगावी अणि कारवार जिल्हयाचे अधिवासी.** (क) जन्म तारीख ०२ जानेवारी २००७ ते ०१ जानेवारी २०१० च्या दरम्यान. (ड) मार्च / एप्रिल / मे २०२४ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालांत (दहावी) परीक्षेला बसणारा / बसणारी. (इ) जून-२०२४ मध्ये इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेण्यासाठी पात्र असावे.

४. **शारीरिक पात्रता:-** सैन्यदलात अधिकारी बनण्यासाठी दिलेल्या सर्व निकषांसाठी पात्र असावे. UPSC ने NDA आणि INA साठी दिलेल्या सर्व शारीरिक निकषांस पात्र असावे. हे निकष UPSC तथा संस्थेच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. काही **प्रमुख निकष पुढीलप्रमाणे**:- उंची - मुलांसाठी कमीत कमी १५७ सें.मी. मुलींसाठी कमीत कमी १५२ सें. मी. वजन -४३ कि.ग्रा, रातांधळेपणा किंवा रंगांधळेपणा नसावा. मुलांसाठी छाती न फुगवता - ७४ से.मी. फुगवून - ७९ से.मी. NDA / INA प्रवेशासाठी UPSC च्या आधिसूचनेनुसार डोळयांची क्षमता असावी.

५. **लेखी परीक्षा आणि मुलाखत :-** पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा इंग्रजी माध्यमातून **२८ एप्रिल २०२४** रोजी विविध केद्रांवर घेतली जाईल. परीक्षेमध्ये एकाच प्रश्नपत्रिकेत ६०० मार्कांचे बहुपर्यायी Multiple Choice Questions, ७५ प्रश्न गणिताचे आणि ७५ प्रश्न सामान्यज्ञान General Ability Test (GAT) असे एकूण १५० प्रश्न असतील. प्रत्येक योग्य उत्तराला (४) गुण व चुकीच्या उत्तरास (-१) गुण मिळतील. लेखी परीक्षा साधारणत: इयत्ता ८ वी ते १० वीच्या स्टेट बोर्ड व सी.बी.एस.ई. च्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल. यशस्वी उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलवण्यात येईल.

६. मुलांसाठी ऑनलाईन अर्ज www.spiaurangabad.com या संकेत स्थळावर आणि मुलींसाठी ऑनलाईन अर्ज www.girlspinashik.com या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. परीक्षा शुल्क रूपये ४५०/- (परत न करता येण्याजोगे) ऑनलाईन फक्त क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड किंवा नेटबँकीग इत्यादी व्दारे भरावे. डिमांड ड्राफ्ट किंवा चलानव्दारे भरलेले परीक्षा शुल्क स्विकारले जाणार नाही. प्रवेश अर्ज संस्थेच्या अटी व शर्ती नुसार भरलेला नसल्यास अर्ज नामंजूर होइल, तसेच प्रवेश परीक्षा शुल्क परत मिळणार नाही.

७. **प्रवेश अर्ज स्विकारण्याची शेवटची तारीख : १० मार्च २०२४ संध्याकाळी ६:०० वाजेपर्यत.**

८. **हॉल तिकीट:- दिनांक १० एप्रिल २०२४** सकाळी १०:०० वा. नंतर संस्थेच्या संकेत स्थळावरून डाऊनलोड करून घेता येतील.

९. परीक्षा संबधीत सूचनांसाठी मुलांनी www.spiaurangabad.com व मुलींनी www.girlspinashik.com हे संकेत स्थळ वेळोवेळी तपासावे. इतर कोठेही हया बाबत सूचना दिल्या जाणार नाहीत.

स्वाक्षरीत/-
(एस फिरासत)
मेजर (निवृत्त)

सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था

शुध्दीपत्रक

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था,

एन-१२, सिडको, छत्रपती संभाजीनगर

**शुध्दीपत्रक -प्रवेश सूचना -एसपीआय, (मुले) छत्रपती संभाजीनगर, (मुली) नाशिक**

दिनांक १५,१६,१७,१८ व १९ डिसेंबर २०२३ रोजी प्रसिध्द झालेल्या जाहिरातीबाबत शुध्दीपत्रक

**ऑनलाईन अर्जाबाबत मुदतवाढ**

२९ फेब्रुवारी २०२४ संध्याकाळी ६:०० वाजेपर्यंत ऐवजी १० मार्च २०२४ संध्याकाळी ६:०० वाजेपर्यंत असे वाचावे.

**उंची :-**

**मुलांसाठी - १५७ सें. मी. व मुलींसाठी - १५२ सें. मी.**

सैनिकी सेवापूर्व शिक्षण संस्था * छत्रपती संभाजीनगर * महाराष्ट्र शासन